| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप-आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,<br>बंगला नं ६, येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |
|---|---|---|

जावक क्रमांक–पोउपआ/वाह/नियो./2061 /२०२४ दिनांक :- २०/०३/२०२४

## प्रेसनोट

पुणे शहरात मोठया प्रमाणात वाहनांचे संख्येमध्ये झालेली वाढ व त्या प्रमाणात रस्त्यांची न झालेली वाढ, त्यामुळे रस्त्यांवर वाहनांची वाढलेली घनता, यामुळे वाहतुक कोंडी निर्माण होत आहे. तसेच विविध मोठे प्रकल्प (मेट्रो, उड्डाणपूल, विविध विकास कामे) सुरु असल्यामुळे रस्त्यावरील जागा मोठया प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे नागरिकांना मोठा धोका व गैरसोय होते.

त्याकरिता जनतेस पोहचणारा धोका, अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. ०१९६/८७१/सी.आर.-३७/टी.आर.ए.-२, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, वाहतूकी संदर्भात नव्याने आदेश निर्गमित करीत आहे.

**पुणे शहरामधील पार्किंग जागेचा वापर माल वाहतुक करणा-या वाहनांनी लोडिंग / अनलोडींग करतेवेळी केल्यामुळे व इतर वाहनांना पार्किंगला जागा उपलब्ध होत नसल्यामुळे, शहरामधिल अंतर्गत रस्त्यावर सर्व प्रकारच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांमधुन साहित्यांची लोडिंग / अनलोडिंग करण्यासाठी (अत्यावश्यक सेवेतील वाहने, पब्लीक ट्रान्सपोर्ट बसेस, इत्यादी वगळुन) तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगिकतत्वावर खालील प्रमाणे नव्याने आदेश निर्गमीत करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.**

❖ <u>दिनांक २३/०३/२०२४ रोजी पासुन सकाळी ०९:०० ते १२:०० व १६:०० ते २१:०० वा. पर्यत प्रवेश वंद असलेले रस्ते</u>

१. **लक्ष्मी रोड** - संत कबीर चौक ते टिळक चौक
२. **शिवाजी रोड** - स.गो. बर्वे चौक ते जेधे चौक
३. **बाजीराव रोड** - पुरम चौक ते गाडगीळ पुतळा चौक
४. **केळकर रोड** - टिळक चौक ते अप्पा बळवंत चौक
५. **कुमठकर रोड** - टिळक चौकते शनिपार चौक
६. **टिळक रोड** - टिळक चौक ते जेधे चौक
७. **जंगली महाराज रोड** - स.गो. बर्वेचौक ते खंडोजीबाबा चौक
८. **फर्ग्युसन कॉलेज रोड** -खंडोजीबाबा चौक ते वीर चाफेकर चौक
९. **कर्वे रोड** -खंडोजीबाबा चौक ते पौड फाटा
१०.**महात्मा गांधी रोड** - पंडोल अपार्टमेंट चौकतेडॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक
११.**नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क** -कोरेगाव पार्क जंक्शन ते ताडीगुत्ता चौक

(**रोहिदास पवार**)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३ पुणे शहर.